**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- १३/१२/२०१८

# मालेगाव शहरातील लुम कारखानदाराकडुन घातक अग्निशस्त्रे जप्त
## ०२ पिस्टल, ०५ जिवंत काडतुसे व ०२ मॅगझिन हस्तगत - स्थानिक गुन्हे शाखेची मालेगावात चौथी कारवाई

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सत्वर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची जिल्हाभरात धडक कारवाई सुरू आहे. मालेगाव शहरातील मुशावरत चौक परिसरात सरदार बिल्डींगसमोर अवैधरित्या **घातक अग्निशस्त्रे बाळगणारे** एका इसमास स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले असुन त्याचे कब्जातुन **०२ देशी बनावटीचे पिस्टल, ०५ जिवंत काडतुसे, ०२ मॅगझिनसह** हस्तगत करण्यात आले आहे.

दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी रात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात मालाविरूध्दचे गुन्हयातील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना खब-यामार्फत मिळालेल्या गुप्तबातमी नुसार, मालेगाव शहरातील मुशावरत चौक परिसरात काही संशयीत इसम हे अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन गुन्हा करण्याचे तयारीत असल्याचे खात्रीशीर रित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने **मुशावरत चौक परिसरातील** सरदार बिल्डींग समोर सापळा रचुन संशयीत **इसम नामे हिफजुल रहेमान मोहमद इद्रीस, वय २४, रा.नयापुरा, ग.नं.११, मालेगाव** यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जातुन **०२ देशी बनावटीचे पिस्टल**, **०५ जिवंत काडतुसे**, **०२ मॅगझिनसह** हस्तगत करण्यात आले आहे. सदर इसमाकडे चौकशी करता त्याचेकडे कोणताही शस्त्र परवाना मिळुन आला नाही. सदर इसम हा विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगतांना मिळुन आला असुन त्याचेविरूध्द **आझादनगर पोलीस ठाणे** ॥ गुन्हा रजि.नं. **१८६/२०१८, भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताब्यात घेतलेला **इसम नामे हिफजुल रहेमान** हा लुम कारखानदार असुन मालेगाव शहरात त्याच्या स्वत:च्या कापडाच्या मिल आहे. **स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची** अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांवर धडक कारवाई सुरू असुन **मालेगाव शहरात** गेल्या महिनाभरात **अग्निशस्त्रे बाळगणा-यांवर आर्म अ‍ॅक्ट प्रमाणे चौथी** कारवाई आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो,** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सपोनि श्री. संदिप दुनगहू,** सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, चेतन संवत्सरकर, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे.